# प्रेसनोट तारीख २७/०९/२०१७

## येरवडा पोलीस ठाण्याचे हददीत घरफोडी करणारे अटटल गुन्हेगारांस अटक करुन त्यांचे कडुन १७ लाख रुपयाचा ऐवज जप्त

---------------o-----------------

येरवडा पोलीस ठाणेचे हददीत घर फोडीचे गुन्हे घडत असताना गुन्हा रजि नंबर ७३६/२०१७ भादविक ४५४,३८०,५११ या गुन्हयाचा तपास करत असताना तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हयाचे येरवडा ते हडपसर मार्गावरील शासकीय व खाजगी सीसीटीव्ही चे फुटेज चेक करुन गुन्हयातील संशयीत आरोपी यांची ओळख पटवली. त्यावरुन आरोपी यांना शोध घेत असतांना मिळत्याजुळत्या वर्णनाचे आरोपी तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक लोहार व त्यांचे स्टाफला सर्किट हाऊस ते मोरवाडा ब्रीज दरम्यान रस्त्यावर दिसुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन झडती घेतली असता त्यांचेकडे गुन्हयात वापरलेले घरफोडी करण्याची साधने व वापरलेली मोटारसायकल मिळुन आली त्यावरुन त्यांना विचारपुस केली असता त्यांनी आपले नाव १) रवीसींग शामसिंग कल्याणी वय २० वर्षे, रा. कोठारी व्हील्स जवळ, रामटेकडी हडपसर पुणे २) गोविंदसिंग अंगदसिंग कल्याणी वय १९ वर्षे, रा. सदर असे असल्याचे सांगुन त्यांनी वरील गुन्हा केल्याचे कबुल केल्याने त्यांस दाखल गुन्हयात अटक केले. सदर गुन्हयाचा तपास करत असतांना आरोपी नामे गोविंद याने माहिती देवुन गुन्हयातील चोरी केली कार व गुन्हे करण्यासाठी वापरलेली वेगवेगळया कार,तसेच भोसरी पो.स्टे.हद्दीतुन चोरलेली ईको मोटार कार असे मुद्देमाल व येरवडा पारीसरात केलेले ७ गुन्हयाचीं कबुली देली. तसेच पुणे शहरात विवीध ठिकाणी त्यांचे साथीदार नामे संगतसिंग कल्याणी व बिंतोसिंग कल्याणी यांचे सोबत गुन्हे केल्याची कबुली दिली. तसेच त्यांचेकडुन विश्रांतवाडी पोलीस ठाणे कडील -२, बिबेवाडी कडील – ४, सिंहगड रोड पो.स्टे कडील २, सहकार नगर पो.स्टे कडील २, भारती विद्यापिठ पोलीस ठाणे कडील २ भोसरी पो.स्टे कडील १ असे एकुण २० घरफोडीचे गुन्हे उघडकिस आणले आहेत.

आरोपी यांचेकडुन १ मारुती झेन कार,२ मारुती ईको कार,१ होंडा शाईन मोटारसायकल, ३५७ ग्रॅम सोने, घरफोडी करण्याची साधने असे एकुण रुपये १७,२०,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी सध्या येरवडा पोलीस ठाणे येथे पोलीस कोठडीत असुन त्यांचेकडे अधिक तपास सुरु आहे.

वरील कामगीरी पोलीस उप आयुक्त परि-४, श्री दिपक साकोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री वसंत तांबे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुकुंद महाजन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अनिल लोहार, गणेश कुताळ, पो.हवा. बाळु बहिरट, अजिज बेग, हणमंत जाधव,संतोष बढे,पो.ना. पंकज मुसळे, मनोज कुदळे,नागेश कुवर, नवनाथ मोहिते,सुनिल नागलोथ,अशोक गवळी; पो.शिं. विष्णु सरवदे, सुनिल सकट, सचिन पाटील, सचिन रणदिवे, गणेश शिंदे, अजय पडोळे, म.पो.शि. शिवानी जगताप. यांचे पथकाने केली आहे.


येरवडा पोलीस ठाणे पुणे
गुन्हा रजि. नंबर ७२०/२०१७
भादविक ४५४,४५७,३८०,३४
या तसेच येरवडा पोलीस ठाणे कडील इतर
घर फोडी गुन्ह्यातील आरोपीकडुन जप्त
करण्यात मुद्देमाल सोन्याचे दागिने.

